### शरीरविकृतीशास्त्र विभाग

## महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ”राष्ट्रीय पॅथोलॉजी दिन” साजरा

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पॅथोलॉजी (शरीरविकृतीशास्त्र) विभागातर्फे नुकताच ”राष्ट्रीय पॅथोलॉजी दिन” जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे साजरा करण्यात आला. ”राष्ट्रीय पॅथोलॉजी दिन” हा डॉ. वसंत रामजी खानोलकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दि. १३ एप्रिल या दिवशी साजरा केला जातो.

यानिमित्त सुप्रसिध्द कर्करोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर पेठे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. ”कर्करोगाच्या रुग्णांमधील रोगनिदान, चाचण्या, लक्षणे आणि उपचार यामधील परस्परसंबंध” हा व्याख्यानाचा विषय होता.

डॉ. चंद्रशेखर पेठे यांनी कर्करोगाच्या निदानामधील पॅथोलॉजिस्ट डॉक्टरांच्या अहवालाचे महत्त्व विषद केले. कर्करोग रुग्णांच्या बायोप्सी किंवा शस्त्रक्रियेनंतरच्या नमुन्यांची जी हिस्टोपॅथोलॉजी तपासणी केली जाते त्याचा अहवाल बिनचूक असणे व त्यात सर्व माहिती तपशीलवार असणे पुढील उपचारांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असून त्यावरच पुढील उपचारांची दिशा ठरते, असे त्यांनी व्याख्यानात नमुद केले.

कर्करोगावरील नवनवीन रोगनिदान पध्दती तसेच उपचार पध्दती यामध्ये कालानुरुप काय बदल होत आहेत याबद्दल त्यांनी तपशीलवार माहिती दिली.

कार्यक्रमाचा समारोप पॅथोलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेंद्र चौधरी यांनी आभारप्रदर्शनाद्वारे केला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पदव्युत्तर महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील आणि पदवी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. व्यंकट गिते यांचे मार्गदर्शन लाभले.


Purpose
GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
12/464/204, Sharanpur Gaothan, Nashik,
Maharashtra 422007, India
Lat 19.996732° Long 73.777057°
15/04/2025 03:32 PM GMT +05:30